# संकरीत गो पैदास प्रकल्प
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी

जा.क्र. संगोपैप्र/ ३६० / २०२४ दिनांक १६/०८/२०२४

## ई –निविदा सुचना क्रमांक १ /२०२४-२५

संकरीत गो पैदास प्रकल्प व ना म कृवि,परभणी खालील कामाकरिता ई –टेन्डरिंग पद्धतीने वनामकृवि,परभणी च्या प्रकल्पग्रस्त कंत्राटदाराकडून ई –निविदा मागवीत आहे .

निविदा विषयी तपशील महाराष्ट्रशासनाच्या ई –टेन्डेरिंग पोर्टल ( https://mahatenders.gov.in ) वर दिनांक १६/०८/२०२४ पासुन पहावयास मिळेल.

| अ क्र | कामाचे नाव | अमानत रक्कम रु. | कंत्राट कालावधी | कोऱ्या निविदेची किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| १. | संकरीत गो पैदास प्रकल्प, वनामकृवि, परभणी या कार्यालयात शेती कामासाठी मजूर, गुराखी,दोग्धे, ट्राक्टर चालक,वीजतंत्री कार्यालय मदतनीस या कंत्राटी मजुरांचा पुरवठा करणे बाबत | ३८,१०६/- (परतावा ) | ११ महिने | २०००/- ( ना परतावा) |

प्रस्तुत निविदा सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळ ( website) www.vnmkv.ac.in वर उपलब्ध आहे .

सदस्य सचिव ई –निविदा
समिती तथा जेष्ठ शास्त्रज्ञ

जेष्ठ शास्त्रज्ञ
संकरित गो.पैदास प्रकल्प
व.ना.म.कृ.वि ,परभणी

## लिफाफा 'अ' मध्ये सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे

**(स्वयंसाक्षाकित सत्यप्रती)**

१. कंत्राटदाराने त्याच्या कंपनीचे / संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक.

२. मा. कामगार आयुक्त यांचे मजुर पुरवठा प्रमाणपत्र बंधनकारक. (कार्यरंभ आदेश प्राप्त झाल्याच्या एक महिन्याच्या आत कार्यालयास सादर करणे) (१९७० ॲक्ट)

३. व्यवसाय कर (Professional Tax) नोंदणी प्रमाणपत्र बंधनकारक.

४. कर्मचारी राज्य विमा (ESI) नोदंणी प्रमाणपत्र बंधनकारक.

५. वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र बंधनकारक. (शेतीच्या कामासाठी वस्तु व सेवा कर अग्राह्य गहणार नाही)

६. भविष्य निर्वाह निधी (पीएफ) नोंदणी प्रमाणपत्र.

७. यापूर्वी विद्यापीठामधील कार्यालयास मजूर पुरवठा केला असल्यास लगतच्या वर्षाचा / एक वर्ष पूर्वीचा भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून लेखा परिक्षण रिपोर्ट (Audit report) जोडणे बंधनकारक आहे, सोबत जोडले नसल्यास अपात्र करण्यात येईल.

८. निवीदा भरण्यापुर्वीच्या सहा महिण्याचे संस्थेने वस्तु व सेवा कर (जिएसटी) भरल्याचे चालान बंधनकारक

९. व्यवसाय कर मागील तीन आर्थिक वर्षात भरलेले चालान बंधनकारक.

१०. आयकर प्रमाणपत्र मागील तीन वर्षाचे सनदी लेखापाल याच्या स्वाक्षरीचा लेखा परिक्षा अहवाल (Audit Report) बधंकनकारक

११. मागील तीन आर्थिक वर्षाचा आयकर रिटर्न्स भरलेले (Income Tax Returns)विवरण पत्र बंधनकारक

१२. वरिल अटी व शर्ती मधील अट क्र. ९,१० व ११ मधील तीन वर्षाचा कालावधी हा ज्या कंत्राटदाराच्या नोंदणीला तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्यांना मागील तीन वर्षाचा कालवधी व ज्या कंत्राटदारांच्या नोंदणीला तीन वर्ष पूर्ण झाले नाहीत त्यांच्यासाठी नोदणी पासूनचा कालावधी लागू राहील.

१३. खाजगी सुरक्षा सेवा पुरवठा करण्याबाबत महाराष्ट्र शासन यांचे नोंदणी प्रमाणपत्र बंधनकारक (केवळ सुरक्षा रक्षकाच्या सेवा पुरविणा-या कंत्राटदारांसाठी).

१४. निविदाधारकांचे कोणत्याही शासकिय/निमशासकिय/महामंडळाच्या काळया यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे स्वंयघोषीत प्रमाणपत्र लेटर हेडवर बंधनकारक.

१५. निविदा समितीने निश्चीत केलेल्या नियम व अटी/शर्थी मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र लेटरहेडवर बंधनकारक.

१६. निवीदाधारक किंवा संस्था यांच्या विरोधात कुठेही व कोणत्याही प्रकारचे तक्रार/गुन्हा दाखल नसल्याचे अथवा कोणत्याही फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल नसल्याचे रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र बंधनकारक राहील.

१७. निविदेची अनामत रक्कम भरणे बंधनकारक. (एकूण रक्कमेच्या १ टक्के अनामत रक्कम)

१८. पॅनकार्ड व आधारकार्ड च्या सत्यप्रत बंधनकारक (स्वतः स्वाक्षरीची)

१९. निवीदा धारकाने निविदेसोबत वैध विद्यापीठ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक (परभणी मुख्यालयासाठी) तसेच जिल्हा पुनर्वसन कार्यालयाकडे नोंद असल्याचे प्रमाणपत्र असल्यास सोबत जोडण्यात यावे.

२०. विद्यापीठातील ज्या कार्यालयाकडे पशुधनाचे संवर्धन व संशोधन केले जाते अशा कार्यालयामध्ये पशुधनाच्या क्षेत्रात शासकीय संस्थेत कार्य केल्याचे अनुभव असणारे कंत्रादारास पात्र राहतील.

ज्येष्ठ शास्त्र
संकरित गो पैदास

(२१)

## (I) अटी व शर्ती (सर्वसाधरण)

१. ज्या निविदाधारक कंत्राटदाराचे "अ" लिफाफ्यातील कागदपत्रे अपुर्ण असतील त्या कंत्राटदाराचा "ब" लिफाफा उघडण्यात येणार नाही.

२. वित्तीय लिफाफा उघडण्याच्या वेळापत्रकात दिलेली वेळ व दिनांकामध्ये ऐनवेळी बदल होऊ शकते.

३. तांत्रिक (लिफाफा अ) व दरपत्रक (लिफाफा ब) उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीने दिलेल्या तारखेस व वेळेस उपस्थित राहणे आवश्यक राहील. उपस्थित नसल्यास संबधितांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४. निविदा धारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची जबाबदारी त्यांची स्वतःची राहील. खोटे कागतपत्रे सादर केल्याचे कोणत्याही टप्यावर दिसुन आल्यास ते अटी शर्तीचा भंग समजून त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल. एका निविदाधारकाला फक्त एकच निविदा सादर करता येईल.

५. अटी घालुन दिलेले (सशर्त) दर विचारात घेतले जाणार नाहीत.

६. ज्या निविदाधारक/कंत्राटदारास ई-निविदा सुटल्यास/मिळाल्यास त्या निविदाधारक कंत्राटदारास ई-निविदा नियम व अटी मान्य असल्याबाबत रु.५००/- चे बंधपत्र द्यावे लागेल व करारनामा करावा लागेल.

i) बंधपत्रात विद्यापीठाने निर्गमीत केलेले परिपत्रकामधील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

ii) प्रत्येक निविदेस नविन बंधपत्राचा वापर करणे आवश्यक आहे.

iii) कंत्राटदाराने संबंधीत विभागाने प्रसारीत केलेल्या प्रत्येक ई-निविदेसाठी मागणी केलेले बंधपत्रके नियमानुसार सादर करावीत.

iv) रु. ५००/- च्या बंधपत्रावर परिशिष्ट १ मधील सत्यप्रतिज्ञापत्र मागविण्यात येते, या सत्य प्रतिज्ञापत्रात कंत्राटदाराने त्यांचे नाव, वय, राहण्याचे ठिकाण व कामाचे संपूर्ण नाव कार्यालयाच्या नावासहित भरणे व सदरील बॉन्डवर मागणी केलेल्या माहितीप्रमाणे संगणीकृत करणे आवश्यक आहे.

७. पुरविलेल्या मनुष्यबळापैकी एखादा कामगार त्याच्या अयोग्य वर्तन किंवा सुरक्षेच्या कारणास्तव कार्यालयास नको असल्यास, तो तात्काळ बदलुन द्यावा लागेल.

८. पुरविलेल्या मनुष्यबळापैकी कोणालाही कार्यालयाच्या पुर्व मान्यतेशिवाय कंत्राटदारास बदलता येणार नाही.

९. कंत्राटदाराने पुरविलेल्या मनुष्यबळास कंत्राटामध्ये ठरलेल्या रक्कमे व्यतिरिक्त नियमित शासकिय कामगार/ कर्मचारी कायद्याप्रमाणे कोणतेही फायदे कंत्राटाचा कालावधी सुरु असताना किंवा त्यानंतरही देय असणार नाही. तसेच त्यांना शासकिय सेवेत सामावून घेण्याचा दावा करता येणार नाही. सदर कंत्राटाच्या अधिनस्त त्यांच्या सेवा ह्या पुर्णपणे तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपाच्या असतील.

१०. महिना अखेरीस कंत्राटदाराने कामाचे उधारी देयक सादर करावे व त्यानंतर देयकाची रक्कम धनादेशाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने अदा केली जाईल.

११. कंत्राटी कामगार कायदा (नियमन व निर्मुलन) १९७० मधील कायद्यान्वये आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता कंत्राटदारांनी करावी त्या संदर्भात या कार्यालयावर कुठलीही जबाबदारी राहणार नाही.

१२. काम करतेवेळी एखाद्या कामगाराला ईजा अथवा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१३. एखाद्या कामगाराबद्यल तक्रार आल्यास त्याच्या जागेवर त्वरीत दुसरा कामगार पुरवावा लागेल.

१४. कामगार हा १८ वर्षाच्या वर असावा तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावा व कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसुन ते शारिरीक दृष्ट्या सक्षम असावेत आणि त्याचे चारित्र्य चांगले असावे.याबाबत कार्यालय प्रमुखाने खात्री करावी व काही अघटीत घडल्यास कार्यालय प्रमुख जबाबदार राहील.

१५. कंत्राटदाराकडुन पुरवठा होणारे कंत्राटी कामगार नम्र,कार्यक्षम आणि कार्यतत्पर असणे आवश्यक आहे त्यांची वर्तणूक असमाधानकारक आढळून आल्यास, कंत्राटदाराने कार्यालयाच्या सुचनेनुसार योग्य बदली कामगार देणे बंधनकारक राहील.

१६. कंत्राटी कामगारांना शासकिय काम वेळेत करावे लागेल. संबंधीत कार्यालयाच्या गरजेनुसार संबंधीत कंत्राटदाराने कामगारांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

जेष्ठ

१७. निविदेच्या प्रत्येक पानावर निविदाधाराकने स्वाक्षरी/डीजीटल स्वाक्षरी करावी, निविदेमध्ये खाडाखोड किंवा उपरीलेखन करु नये.

१८. निविदेमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती निविदा स्विकृत झालेल्या तारखेपासून अंमलात येतील.

१९. वेळोवेळी निर्गमित होणारे विद्यापीठ / शासकिय आदेश/परिपत्रकाचे काटेकोरपने पालन करणे संबंधीत निविदाधारकावर बंधनकारक राहील.

२०. प्रत्येक कंत्राटी कामगारास कॉन्ट्राक्ट लेबर अॅक्ट मधील नमुन्याप्रमाणे कंत्राटदाराने ओळखपत्र देणे बंधन कारक असुन प्रत्येक कामगाराला कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र असणे गरजेचे आहे.

२१. कंत्राटी कामगारास कामाच्या परीसरात काम करतेवेळी इजा, अपघात किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. विज, पाऊस भुकंप वादळमुळे किंवा हिंस्त्र पशु व सरपटणारे प्राणी यांच्यापासून इजा अपघात अथवा इतर करणास्तव मृत्यु संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. पुरविण्यात येणाऱ्या कामगारास रक्कम रु. ५.०० लाख इतका सामुहीक अपघाती विमा कंत्रादाराने उतरविणे बंधनकारक राहील. सदर विमा उतरविण्याबाबतची कागदपत्रे काम मिळालयापासून एक महिन्याच्या आत कार्यालयास सादर करावे विमा काढल्याशिवाय पहिले वेतन काढण्यात येऊ नये.

२२. कंत्राटी मजूर पुरवठ्याचे सब कॉन्ट्रक्ट/कंपनी/ठेकेदार इतर व्यक्ती यांना देता येणार नाही.

२३. कार्यारंभादेश दिल्यापासुन कंत्राटाच्या कालावधी दरम्यान मनुष्यबळ पुरवठाराचे एकंदरीत कामकाजाचा मध्यावधी आढावा घेतला जाईल व त्यावेळी काम समाधानकारक दिसुन आल्यास, पुढील मुदतवाढ देण्याबाबत पुर्नविचार केला जाईल.

२४. कंत्राटदार निश्चित झाल्यानंतर त्यांनी संबंधी कामगाराची यादी व पात्रतेच्या कागदपत्रांच्या प्रती कार्यालयास सादर कराव्यात त्यानंतर संबंधीत उमेदवारांची पात्रता व योग्यतेची खात्री कार्यालयामार्फत झाल्यानंतर त्यांना कामावर रुजू करुन घेण्यात येईल. अपात्र किंवा असक्षम उमेदवारांना नाकारण्याचा अधिकार संबधीत कार्यालय प्रमुखास राहील.

२५. कार्यालयास आवश्यक असलेल्या कामगार संख्येनुसार मनुष्यबळ पुरवठा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. आवश्यकतेनुसार मंजुर संख्येच्या मर्यादेत कामगार संख्या कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार संबंधीत कार्यालय प्रमुखास राहील.

२६. निविदा कालावधी दरम्यान कंत्राटदाराचा पत्ता किंवा संपर्क दुरध्वनी क्रमांक बदलल्यास त्याची लेखी सुचना कार्यालयास देणे बंधनकारक राहील.

२७. नेमणुक केलेल्या कामगाराने या कार्यालयाच्या स्थावर, जंगम व इतर मालमत्तेचे नुकसान किंवा चोरी केल्यास त्याची नुकसान भारपाईपोटी देय होणारी रक्कम कंत्राटदार/एजन्सीच्या सुरक्षा ठेवीतून परस्पर कापून घेण्यात येईल. तसेच नुकसानाची रक्कम सुरक्षा ठेव पेक्षा जास्त असल्यास सदर रक्कमेची भरपाई करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२८. कंत्राटदार/एजन्सीकडून पुरविण्यात आलेल्या कामगारांनी कार्यालयातील शिस्तीचे पालन करणे बंधनकारक असून शिस्तीचे पालन करतात की नाही तसेच कामे योग्यरित्या पार पाडल्या जाते का नाही याची देखरेख करण्याचे काम कंत्राटदाराचे राहील.

जेष्ठ शा

(५)

## (II) अटी व शर्ती – (आर्थिक बाबींकरीता)

१. सुरक्षा अनामत रक्कम

i. मनुष्यबळ पुरवठ्याचा आदेश मिळाल्यानंतर निविदा रक्कमेच्या ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम ही १५ दिवसाच्या आत डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) ने नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांचे नावे जमा करावी लागेल. याबाबत कार्यालय प्रमख / निविदा समीतीने दक्षता घ्यावी.

ii. सदर रक्कम कंत्राटाचा कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच परत केली जाईल, त्यावर कोणतेही व्याज देय असणार नाही.

iii. करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग झाल्यास, सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल, करारनामा रद्द केला जाईल, तसेच संबंधित कंत्राटदाराचा समावेश काळया यादीत केला जाईल.

iv. कंत्राटी कामगारांना वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन निर्णय नुसार व त्याअनुषंगाने नियंत्रक वनामकृवि परभणी यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार वेतन देणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील. निश्चित केलेल्या वेतनामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

२. रकमेची अदायगी-कामगाराच्या उपस्थितीचा तपशील आल्यानंतर त्या आधारे त्यांनी दोन दिवसात सविस्तर देयक तीन प्रतीत सादर करावे. त्यामध्ये वेतनासह कामगार कायद्यानुसार देयक सादर करावे.

३. निविदा उघडण्यात आल्यानंतर दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीकडे राहतील.

४. दोन किंवा अधिक सेवा पुरवठादारांचे सेवा शुल्क दर एक समान आल्यास ज्या निविदाधारकाचा अनुभव जास्त असेल त्यास पात्र करण्यात येईल. याबाबत अध्यक्ष ई-निविदा समिती यांचा निर्णय अंतिम राहील.

५. सेवा पुरवठादाराने दर सादर करताना एकूण किमान वेतन (मजूर / कामगार) यांच्या एकूण किमतीच्या वेतनावर कमीत कमी २ टक्के सेवाशुल्काचा दर दर्शविण्यात यावा. या पेक्षा कमी सेवा शुल्काची निविदा अपात्र करण्यात येतील

६. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या सर्व कंत्राटी कामगारांचे खाते कार्यक्षेत्राच्या परीसरातील राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेत उघडण्यात यावे.

७. निविदा धाराकाने सादर केलेली निविदा नामंजुर झाल्यास, त्याची बयाना रक्कम जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत परत करण्यात येईल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

८. कंत्राटदाराने त्याच्या बिलाचा मोबदला धनादेशाद्वारे मिळताच कंत्राटी मजुरोच्या निव्वळ वेतनाच्या एकत्रितरित्या असललेला धनादेश बँकेत जमा करावा. म्हणजे पर्यायाने सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदायगी त्यांच्या खात्यावर त्वरीत केली जाईल. कत्रांटदार पुढील मासिक देयका सोबत बँकेत कर्मचारी निहाय वेतन जमा झाल्याचे बँकेने प्रमाणित केलेले विवरणपत्र जोडणे बंधनकारक आहे. तसेच इतर नियमीत वर्गणी / कपाती उदा. भविष्य निधी (PF) व इतर संबंधीताच्या खात्यावर जमा केल्याच्या प्रती जोडाव्यात, त्याशिवाय पुढील देयक अदा केले जाणार नाही.

९. कामाचा आदेश मिळाल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकाने प्रथम क्रमांकाच्या लघुत्तम निविदाधारकाने दिलेल्या दराने काम करण्याची समर्थता दर्शविल्यास काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकाने असमर्थता दर्शविल्यास तिसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास प्रथम क्रमांच्या लघुत्तम निविदा धारकाच्या दराने काम करण्यास समर्थता दर्शविल्यास त्यास काम मंजुर करण्याचा अधिकार निविदा समितीस राहील.

१०. supply of farm labour साठी वस्तु व सेवा कर (GST) भरण्यासाठी सुट आहे. सर्व कार्यालया प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांनी निविदा काढतांना त्यावर ‘ शेतीसाठी मजूर पुरवठा’ असे नमुद असणे आवश्यक आहे.

११. ज्या कार्यालयात शेती कामा व्यतीरिक्त कार्यालयातील कामासाठी कुशल / अकुशल मजूर / कामगार यांच्या सेवा घेण्यात येत असतील त्या मजूर / कामगार यांचे साठी वस्तु व सेवा कर (GST) भरणे बंधनकारक राहील



जेष्ठ शास्त्रज्ञ

(5)

## (III) अटी व शर्ती – (कायदेशीर बाबींच्या पुर्ततेबाबत)

१. कंत्राटदारास कंत्राट मिळाल्यानंतर दर महिन्याचे वेतन देयक पारीत झाल्यानंतर भविष्य निधी, ई.एस.आय., व्यवसाय कर व वस्तु व सेवा कर संबंधीत खात्यावर भरण्यासाठी संबंधीत कंत्राटदार जबाबदार राहील. सदरच्या रकमा कंत्राटदाराने कोणत्याही परिस्थितीत विहीत कालावधीत संबंधीत खात्यावर भराव्यात व भरणा केल्याचा सविस्तर पुरावा कागदपत्रांसह पुढील महिन्याच्या बिलासह सादर करावा. सदरचा तपशील पुढील महिन्याच्या.बिलासह सादर न झाल्यास बिलाची आदायगी केली जाणार नाही व त्यामुळे उदभवणाऱ्या अडचणींना मनुष्यबळ पुरवठादारास जबाबदार धरण्यात येईल. अशा परिस्थितीत संबंधीत कार्यालय प्रमुख यांचा निर्णय अंतिम असेल.

२. बालमजुर प्रतिबंधक कायद्याचे पालन करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

३. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांच्या वेतनाबाबत कंत्राटी कामगार कायदा व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा यामधील तरतुदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. या बाबतीत काही तंटा अथवा न्यायलयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत कार्यालय प्रमुखावर कसल्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

४. कंत्राटदाराने कामगारास अदा केलेल्या दरमहा भविष्य निर्वाह निधी, गट विमा पावती व वेतन चिठ्ठी भरणा केल्यास त्याचा तपशील व हजेरी कार्ड संबंधीत कार्यालय प्रमुखास दरमहा देणे बंधनकारक राहील.

५. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाची नोदं इत्यादी रजिस्टर ठेवावेत व ते संबंधीत अधिकाऱ्यांच्या तपासणी वेळेस हजर करुन तपासुन घेणे बंधनकारक राहील. संबेधीत कंत्राटदाराने भविष्य निधी संघटन कार्यालयास तपासणीसाठी सादर केलेले अभिलेख्यांची पोच पावतीची छायांकीत प्रत विद्यापीठ कार्यालयास सादर करावी अन्यथा पुढील निविदामध्ये त्यास भाग घेता येणार नाही.

६. शासकिय विमा निधी व कामगार कायाद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

७. कराराचे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद संबंधीत जिल्हयातील न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये सोडविणे बंधनकारक राहील.

८. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा संपूर्ण अधिकार निविदा समितीस राहील.

जेष्ठ शास्त्रज्ञ
संकरित गो.पैदास प्रकल्प,
व.ना.म.कृ.वि .परभणी

(6)

## परिशिष्ट - १

## नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)

## सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी ------------------------------------ वय वर्षे ------------ राहणार --------------------------------------------------------------------------------------------------------- या

या सत्यप्रतिज्ञा पत्राद्वारे लिहुन देतो की, मी --------------------------------------------------------------

फर्मचा/ कंपनीचा मालक असुन ------------------------------------------ या कामासाठी निविदा सादर करीत आहे. त्या निविदेच्या लिफाफा क्र. १ मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी, बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असुन असे शपथपूर्वक खालील अटी व शर्थीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चकीची दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधीदरम्यान, मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहरात खोटी/बनावट कगदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायेदशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

२. जर कंत्राट कलावधीदरम्यान आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही कागदपत्रे खोटी/बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/बनावट, फरशी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

४. ई-निविदा मसुदयातील सर्व अटी व शर्ती मी व्यवस्थित वाचून घेतल्या आहेत व ई-निविदा मसुदयातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

५. माझ्या संस्थेचे/फर्मचे नांव कोणत्याही शासकीय/निमशासकीय/महामंडळाच्या काळया यादीत समाविष्ट नाही.

६. माझ्यावर/माझ्या संस्थेवर/फर्म वर कुठलाही फौजदारी किंवा इतर स्वरुपाचा गुन्हा दाखल नाही.

७. आज पर्यंत मला/माझ्या संस्था /फर्म ला यापूर्वी ई-निविदा प्रक्रियेद्वारे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मजुर पुरवठा करण्याचे कंत्राट मिळालेले नाही.

८ मी सदरील निवीदा प्रक्रीयेतील कोणत्याही अधिकारी /कर्मचारी यांच्यावर राजकीय अथवा इतर प्रकारचा दबाव आणनार नाही तसे कोणत्याही वेळी निदर्शनास आल्यास माझी निवीदा ग्राहय धरण्यात येऊ नये ती रद्द करण्याबाबत चे मी सर्व अधिकार अध्यक्ष निवीदा समीती यांना देत आहे.

कंत्राटदाराची सही/शिक्का

# संकरीत गो पैदास प्रकल्प
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

## ई-निविदा नियमाबाबत कार्यालयाच्या अनुषंगाने (सर्व साधारण) अटी व शर्ती

पशुसवंर्धन व संशोधनाचे काम अत्यावश्यक सेवेत असल्यामुळे ई-निविदेत दिलेल्या सर्व साधारण अटी व शर्ती सोबत या कार्यालयाच्या सर्व साधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१. ई-निविदा शेतीसाठी मजूर पुरवठा करण्यासाठी आहे. त्यामुळे वस्तू व सेवाकर भरण्याची सुट आहे.

२. मजूरांना जनावरांच्या संबंधी काम असल्या कारणाने अचानक मजूर न बदलता संबंधीत कार्यालय प्रमुख यांच्याशी चर्चा करुनच मजूर बदलता येईल, कारण पशुधनाचे काम उदा : वळू संगोपन, वासरांची निगा, दुध काढणे इ. कामे या कार्यालयात ब-याच वर्षापासून ठराविक कंत्राटी मजूरच करतात व त्यांना त्याची पुर्ण कल्पना आहे. असे मजूर नविन कंत्राटदारामार्फत कामावर घेणे नविन कंत्राटदारास बंधनकारक राहील.

३. प्रक्षेत्रावरील दैनंदिन कामे उदा: चारा पिकाची पेरणी, कोळपणी, खुरपणी, कापणी इत्यादी कामे वेळेवर होणे अपेक्षीत आहे. वेळ गेल्यावर सदर कामाचा पुरेपुर फायदा न होता लागवड खर्च काढून उत्पादन कमी होते. त्यामुळे वेळेवर मजूर पुरवठा करणे बंधनकारक राहील. वेळेवर मजूर पुरवठा न केल्यास संबधीत कामाच्या दिरंगाईमुळे होणारे नुकसान संबंधीत कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल. (नैसर्गीक अपत्ती वगळून).

४. ई-निविदा मजूरी रु. ३८,१०,६८१/- असल्यामुळे त्याची अनामत रक्कम (रु. ५ टक्के प्रमाणे) ही रु. १,९०,५३४/- रक्कम नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांचे नावे डिमांड ड्राफ्ट देऊन १५ दिवसाच्या आत जमा करावा लागेल.

५. निवेदाची अनामत रक्कम रु. १ टक्का प्रमाणे निविदा भरतेवेळेस रु. ३८,१०६/- भरणे बंधनकारक राहील.

६. निविदा फिस रु. २,०००/- (नापरतावा) भरावी लागेल.

७. कंत्राटदारास पुरवठा करण्यात येणा-या मजूरांकडून स्वतः हजर राहून काम करुन घ्यावे लागेल व कार्यालयीन शिस्तीचे पालन करुन घ्यावे लागेल.

८. पशुधनाच्या आरोग्याच्या व व्यवस्थापनेच्या दृष्टीने पुरवठा करण्यात येणा-या मजूराच्या कामाच्या वेळात बदल करण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.

९. अत्यावश्यक सेवा असल्यामुळे मजूरांचा पुरवठा नियमित व सुट्याच्या दिवशी सुध्दा काम करणे बंधनकारक राहील.

१०. गरजेनुसार मजूराची संख्या कमी अधिक करण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखचा राहील.

सदस्य सचिव ई-निवीदा समिती
तथा जेष्ठ शास्त्रज्ञ